भाग - ६
गु.र.नं. 3119/2018

२४

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत जाँच फार्म -I)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा)** जळगाव **P.S.(ठाणे):** चोपडा शहर **Year (वर्ष):** 2018

**FIR No.(प्रथम खबर** 0306 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/11/2018 04:54 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day** बुधवार **Date From (दिनांक** 14/11/2018 **Date To ( दिनांक पर्यंत):**14/11/2018

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Time From** 18:05 बजे **Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले** **Date (दिनांक ):** 15/11/2018 **Time (वेळ):** 04:41 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा** **Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ)**15/11/2018 04:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1. (a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशापूर्व,** 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):**भाग 6गुरनं3119/2018 भ्रटाच्

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे** **District(State) (जिल्हा**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री जी.एम.ठाकुर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1963 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e) UID No. (यु.आय.डी.**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| S.No.(अ.क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अॅन्टी करप्शन ब्युरो जळगाव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अॅन्टी करप्शन ब्युरो जळगाव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No.(अ. | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री गणी अहमद शेख | | | 1. आझाद चौक,मशिदी शोजारी,चोपडा ता,चोपडा शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (क्र. | Property Category (संपत्ति श्रेणी) | Property Type (सम्पत्ति का | Description (विवरण) | Value(In Rs/-) (मूल्य |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,500/रू रोख त्यात 500/रू दराच्या 03नोटा अ.पा.लावलेल्या | 1,500 |

10. **Total value of property (In Rs/-)-सम्पत्ति का कुल मूल्य(रु में):** 1,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मृत्यु समीक्षा रिपोर्ट / यू॰डी॰प्रकरण सं., यदि कोई हो ):**

**S.No. (क्र.सं.) UIDB Number (यू॰डी॰प्रकरण सं.)**

12. **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

भाग 6गु.र.न.3119/2018 भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारीत)अधिनियम 2018 चे कलम 7 प्रमाणे फिर्यादी - श्री जी.एम.ठाकुर पोलीस उप .अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव तक्रारदाराचे नाव व पत्ता - श्री योगेश धनराज पाटील वय 36 व्यवसाय- व्यापार रा आडावद ता चोपडा जि. जळगाव आरोपी -श्री गणी अहमद शेख वय 42 व्यवसाय नोकरी, दुरूस्ती लिपीक,नेम-उप.अधिक्षक,भुमि अभिलेख कार्यालय,चोपडा (खाते जमाबंदी ,वर्ग3)रा आझाद चौक,मशिदी शोजारी,चोपडा ता चोपडा जि जळगाव अप.घ.ता.वेळ व ठिकाण दि.14/11/2018रोजी 18.08 वा. चोपडा शहरातील आझाद चोकातील मशिदी जवळ लाचेची रक्कम -1,500/-रू रोख त्यात 500/-रू दराच्या 03नोटा अ.पा.लावलेल्या खुलासा- तक्रारदार हे अडावद गावी सि.स.न.44येथे राहतात त्यांचे घराचे जवळच असलेले सि.स. न.41हे घर व पडीत जमिन तक्रारदार यांनी सुमारे 6 महीण्यापुर्वी विकत घेतलेली आहे .सदरचे घर तक्रारदार यांचे नावावर झालेले आहे सदर घराच्या जागेची भुमी अभिलेख कार्यालया कडुन मोजणी होण्यासाठी तक्रारदार यांनी दि.19/07/2018रोजी भुमी अभिलेख कार्यालय,चोपडा येथे अर्ज दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाणे दि.27/08/2018 रोजी तक्रारदार यांनी 3000/-रूपयांचे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा अडावद येथे चलण भरून भुमी अभिलेख कार्यालय चोपडा येथे दिले त्यानुसार मोजणीची तारीख दिनांक 20/10/2018अशी ठेवण्यात आली होती .परंतु सदर तारीख पुढे ढकलुन नवीन तारीख दि.13/11/2018अशी ठरविली असल्याचे तक्रारदार यांना सदर कार्यालयाचे लिपीक यांनी फोन द्वारे कळविले होते परंतु तक्रारदार यांचे घर मोजणीसाठी कोणीही कर्मचारी न आल्याने तक्रारदार हे दि.13/11/2018रोजी भुमी अभिलेख कार्यालय चोपडा यांच्या कार्यालयात गेले व तेथील अधिकारी यांना भेटले असता त्यांनी तुमचे घर मोजणीसाठी श्री जी.ए.शेख यांची नेमणुक केली असल्याचे व तुमच्या घराची मोजणी उद्या दि .14/11/2018रोजी होणार असल्याचे पत्र तक्रारदार यांना दिले त्या प्रमाणे तक्रारदार यांनी श्री जी.ए.शेख यांचे भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना सदर कार्यालयाच्या मागील बाजुस असलेल्या मुतारीकडे नेवुन तुम्ही मला 3000/-रू दिले तरच मी तुमच्या घराची मोजणी करेल असे सांगीतले त्या वेळी तक्रारदार यांनी त्यांना सदर मोजणी साठी चलनाने 3000/-रू या पुर्वीच भरले असल्याचे सांगीतले त्या वेळी त्यांनी त्या वेतीरीक्त मला 3000/-रू द्यावे लागतील असे स्पष्ट सांगीतले.तसेच मोजणीसाठी लागणारा टेबल व इतर साहीत्य सोबत नेण्यासाठी एक रिक्षा करावी लागेल तसेच सामाण धरण्यासाठी एक माणुस देखील सोबत आणावा लागेल असे देखील सांगीतले.त्या वेळी तक्रारदार यांचे लक्षात आले की श्री जी.ए.शेख मोजणी अधिकारी हे त्यांच्याकडे 3000/-रूपयांची लाचेची मागणी करीत आहेत त्या वेळी तक्रारदार यांनी त्यांना सद्या माझे खिशात पैसे नसुन मी उद्या मोजणी झाल्यानंतर पैसे देतो असे सांगुन निघुन आले आहे.बाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कडे दि.13/11/2018रोजी तक्रार दिली होती,त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने सदर तक्रारीची दि.14/11/2018रोजी पडताळणी केली असता श्री जी.ए.शेख ,दुरूस्ती लिपीक यांनी तक्रारदार यांच्याकडुन तडजोड अंती 2000/- रू ची लाचेची मागणी केली होती त्यानंतर दि.14/11/2018रोजी चोपडा शहरातील आझाद चौका जवळील मशीदी जवळ सापळा लावला असता श्री जी.ए.शेख दुरूस्ती लिपीक यांनी तक्रारदार यांच्याकडुन 1500/-रू लाचेची रक्कम स्वता. स्विकारतांना त्यांनास्नेहात पकडण्यात आले आहे.म्हणुन त्यांच्या विरूध्द वर प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचे प्रथम खबरी अधिकारात असणारे मॅंजी.सो यांच्या कडेन रवाना करून गुन्ह्याचा पुढील तपास श्री जी.एम.ठाकुर पोलीस उप .अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव यांच्याकडे आहे .

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम** KISAN LAXAMAN NAJAN(I (Inspector)) / POBN64414 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** G.M. Thakur **Rank (पद):** Dy SP, ACB, Jalgaon
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा** **District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद लिहुन देतो की, मी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव येथे दि.१३.०९.२०१७ पासुन पोलीस उप अधिक्षक या पदावर कार्यरत आहे. दिनांक १३.११.२०१८ रोजी आम्ही कार्यालयात हजर असतांना श्री.योगेश धनराज पाटील यांनी समक्ष कार्यालयात येवुन लाचेसंबंधी तक्रार केली. त्यावरुन आम्ही मा.आस्थापना अधिकारी, राज्यकर सहआयुक्त, जळगांव विभाग, जळगांव यांना पत्र देवुन त्यांच्याकडुन पंच म्हणुन श्री.शिवकुमार संभाजीराव गौड, राज्यकर निरिक्षक व श्री.श्रीराम बाबुराव पाटील, राज्यकर निरिक्षक यांना उपलब्ध करुन घेतले.

त्यावेळी आम्ही कार्यालयात हजर असलेले तक्रारदार श्री.योगेश धनराज पाटील, व्यवसाय व्यापार रा.अडावद ता.चोपडा जि.जळगांव यांची ओळख सांगुन दोघा पंचाची लाचेचा सापळा केस मध्ये पंच साक्षीदार असल्याची ओळख सांगितली. त्यानंतर आम्ही, तक्रारदार काय हकिगत कथन करतात ती ऐकण्यास सांगीतली. त्यावरुन दोघ पंचानी तक्रारदार यांनी कथन केलेली तक्रार ऐकली. त्यानंतर आम्ही, तक्रारदार श्री.योगेश पाटील यांची कार्यालयातील संगणकावर तयार करण्यात आलेली तक्रार दोघा पंचास वाचावयास दिली. त्यावर तक्रारदार व आमच्या सहया होत्या. सदर तक्रारीतील लेखी मजकुर तक्रारदार श्री.योगेश पाटील यांनी तोंडी कथन केल्याप्रमाणेच असल्याची खात्री झाल्यानंतर आमच्या सुचनेनुसार दोघी पंचानी सदर तक्रारीवर सहया केल्या. तेव्हा आम्ही दोघे पंचाना सांगितले की, तक्रारदार हे दि.१४.११.२०१८ रोजी अडावद ते चोपडा रोडवरील एका शेतात असलेल्या काळभैरव मंदीराजवळ थांबणार असुन आपण दि.१४.११.२०१८ रोजी पुढील कारवाई करु असे सांगुन गोपनियता राखेणबाबत सुचित केले. तसेच दोन्ही पंचाना दि.१४.११.२०१८ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात व तक्रारदार यांना अडावद ते चोपडा रोडवरील एका शेतात असलेल्या काळभैरव मंदीराजवळ हजर राहणेबाबत सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले.

त्यानंतर दि.१४.११.२०१८ रोजी आम्ही दिलेल्या सुचनेनुसार दोघी पंच कार्यालयात हजर झाले. त्यानंतर खाजगी लाल रंगाचे तवेरा वाहन क्र.एम.एच.१९ ए.ई.३०२० वरील चालक पोकॉ महेश शिवाजी सोमवंशी, आम्ही, पोलीस निरिक्षक श्री.निलेश लोधी, दोन्ही पंच, सापळा पथकातील काही कर्मचारी असे खाजगी वाहनाने व पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर हे एका दुचाकी मोटार सायकलीने अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातुन रवाना होवुन ममुराबाद, ईदगांव, धानोरा, मार्गे अडावद ते चोपडा रोडवरील एका शेतात असलेल्या काळभैरव मंदीराजवळ तक्रारदार यांनी सांगितलेल्या ठिकाणी पोहचलो. त्याठिकाणी तक्रारदार हे त्यांचे मोटार सायकलसह उभे होते. त्यांना सोबत आणलेल्या खाजगी वाहनात बसविले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार यांना विचारणा केली की, श्री.जी.ए.शेख यांची कोठे भेट होईल, त्यावर तक्रारदार यांनी सांगितले की, माझे घराच्या जागेची मोजणी करण्यासाठी श्री.जी.ए.शेख यांची नेमणुक झाली असुन सदर मोजणीची तारीख दि.१४.११.२०१८ रोजी असल्याने सदर जागेची मोजणी करण्यासाठी श्री.जी.ए.शेख हे अडावद येथे येण्याची शक्यता असुन मी जर त्यांना फोन लावला तर ते कोठे असल्याबाबत माहिती मिळु शकेल. असे सांगितले. तेव्हा आम्ही, तक्रारदार यांना श्री.जी.ए.शेख यांना फोन लावण्यास सांगितला. तेव्हा तक्रारदार यांनी त्याचा मोबाईल क्रमांक ९९२३५६६४९३ यावरुन श्री.जी.ए.शेख यांचा फोन क्रमांक ८९९९४३५८५९ यावर फोन लावला व तक्रारदार व श्री.जी.ए.शेख यांचे मोबाईल फोनवर संभाषण झाले. त्यावेळी श्री.जी.ए.शेख यांनी तक्रारदार यांना सांगितले की, मी तुम्हाला दोन तासानंतर फोन करतो. तेव्हा आम्ही श्री.जी.ए.शेख यांचा तक्रारदार यांना फोन येईपावेतो मार्गप्रतिक्षा करीत थांबण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार श्री.जी.ए.शेख यांचा तक्रारदार यांना फोन आला व तक्रारदार व श्री.जी.ए.शेख यांचे मोबाईल फोनवर संभाषण झाले व श्री.जी.ए.शेख यांनी तक्रारदार यांना चोपडा शहरातील आझाद चौकात बोलाविले असल्याचे सांगितले. त्यानुसार आम्ही चोपडा येथील आझाद चौकाच्या अलिकडे अर्ध्या कि.मी. अंतरावरुन तक्रारदार व पंच क्र.१ यांना

पडताळणीकामी पाठविण्याचा निर्णय घेतला व तक्रारदार यांना चोपडा आझाद चौकाच्या अलिकडे अर्ध्या कि.मी. अंतरावर जावुन थांबण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे त्यांच्या मोटार सायकलीने रवाना झाले व त्यांच्या मागोमाग आम्ही, दोन्ही पंच, पोलीस निरिक्षक श्री.निलेश लोधी व काही सापळा पथकातील कर्मचारी खाजगी वाहनाने व दोन कर्मचारी एका दुचाकी मोटार सायकलने असे रवाना झालो व चोपडा शहरातील आझाद चौकाच्या अलिकडे अर्ध्या कि.मी.अंतरावर पोहचलो. त्यानंतर आम्ही, तक्रारदार यांना खाजगी वाहनात येवुन बसण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना देवुन व तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देण्याबाबत पोकॉ नासिर देशमुख यांना सुचना दिल्याने पोकॉ नासिर देशमुख यांनी सदरचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार यांच्या शर्टाच्या आत असलेल्या बंडीच्या खिश्यात ठेवण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच कं.१ यांना श्री.जी.ए.शेख, दुरुस्ती लिपीक यांची भेट घेण्यासाठी चोपडा शहरातील आझाद चौक येथे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने व पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर यांना दुस—या मोटार सायकलीने रवाना केले व सापळा पथक तसेच पंच कं.२ हे सोबत आणलेल्या खाजगी वाहना जवळ थांबुन होते. त्यानंतर काही वेळानंतर पोकॉ ईश्वर धनगर यांनी आम्हास मोबाईल फोनव्दारे कळविले की, श्री.जी.ए.शेख, दुरुस्ती लिपीक हे एका रिक्षामध्ये मोजणीचे साहित्य घेवुन अडावद कडे जाण्यास निघाले असुन तक्रारदार व पंच क्र.१ असे तक्रारदार यांच्या मोटार सायकलीने त्यांच्या मागोमाग अडावद कडे जाण्यास निघाले असुन आम्ही दोघे सुध्दा त्यांच्या मागोमाग मोटार सायकलीने अडावद कडे जाण्यास निघालो आहोत. त्यानंतर आम्ही सदरची बाब पंच क्र.२ व सापळा पथकास सांगितली व खाजगी वाहन अडावद गावाकडे घेण्यास सांगितले.

त्यानंतर श्री.जी.ए.शेख ज्या रिक्षामध्ये बसलेले होते ती रिक्षा अडावद बस स्टॅन्ड जवळ थांबली. त्याचवेळी तक्रारदार व पंच क्र.१ हे देखील तक्रारदार यांच्या मोटार सायकलीने सदर ठिकाणी पोहचले. त्यांच्या मागोमाग पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर हे देखील सुरक्षित अंतर ठेवुन थांबले. त्यानंतर पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर हे थांबलेल्या ठिकाणी आम्ही, पोलीस निरिक्षक श्री.निलेश लोधी, पंच क्र.२ व सापळा पथकातील काही कर्मचारी असे खाजगी वाहनाने पोहचले. त्यानंतर श्री.जी.ए.शेख हे रिक्षाच्या खाली उरतले व त्यावेळी तक्रारदार व पंच क्र.१ यांनी रिक्षामध्ये असलेले मोजणीचे सामान रिक्षाच्या खाली उतरविले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ हे मोजणीचे सामान घेवुन मोटार सायकलीने रवाना झाले व श्री.जी.ए.शेख हे देखील त्यांच्या मागोमाग पायी चालत मोजणीच्या ठिकाणी पोहचले. त्यांच्या पाठोपाठ पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर मोटार सायकलने व खाजगी वाहनाने आम्ही, पोलीस निरिक्षक निलेश लोधी, पंच क्र.२ व सापळा पथकातील कर्मचारी रवाना झाले व तक्रारदार यांच्या घराची मोजणी सुरु असलेल्या ठिकाणच्या अलिकडे रोडवर थांबलो. तेव्हा तक्रारदार, श्री.जी.ए.शेख व पंच क्र.१ असे मोजणीच्या साहित्यानिशी मोजणीच्या जागी गेले व त्यानंतर श्री.जी.ए.शेख यांना संशय येणार नाही अशा रितीने आम्ही, पोलीस निरिक्षक श्री.निलेश लोधी, पंच क्र.२ व सापळा पथक असे तक्रारदार यांच्या राहत्या घरी जावुन वरच्या माळयावरील रुममध्ये पोहचलो. सदर जागेची मोजणी झाल्यानंतर तक्रारदार व श्री.जी.ए.शेख असे तक्रारदार यांच्या राहत्या घरी आले. त्यांच्या पाठोपाठ पंच क्र.१ सुध्दा तेथे आले तेथे तक्रारदार यांच्याकडे श्री.जी.ए.शेख यांनी तडजोडीअंती २०००/— रुपयांची मागणी केली. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

श्री.जी.ए.शेख यांनी तक्रारदार यांच्याकडे जमिन मोजणीच्या मोबदल्यात तडजोडीअंती २०००/- रु लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही, तक्रारदार व पंच क्र.१ यांना लाचेची रक्कम घेवुन पाठविण्याचे ठरविले. तसा सविस्तर सापळापुर्वीचा पंचनामा करण्यात आला आहे.

सापळा पुर्वीचा पंचनामा तक्रारदार यांचे अडावद येथील राहत्या घराच्या वरच्या माळ्यावरील रुममध्ये दि.१४.११.२०१८ रोजी आटोपल्यानंतर तक्रारदार हे श्री.जी.ए.शेख यांना लाचेची रक्कम देणार असल्याने आम्ही तक्रारदार व पंच क्रं.१ यांना लाचेची रक्कम घेवुन श्री.जी.ए.शेख यांना देण्यासाठी अडावद एस.टी.स्टॅण्ड येथे पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर आमच्या सुचने वरुन पोकॉ नासिर देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड व नविन सेल टाकून सदर रेकॉर्डर सुरु करुन कोणाला दिसणार नाही अशा रितीने पंच क्र.१ यांना तक्रारदार यांच्या टी शर्टच्या आत घातलेल्या बंडीच्या खिश्यात ठेवुन देवुन तक्रारदार आणि पंच क्रं.१ यांना श्री.जी.ए.शेख यांना लाचेची रक्कम देण्याकरीता अडावद बस स्टॅण्ड येथे तक्रारदार यांच्या दुचाकी मोटार सायकलीने रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ आम्ही, पोलीस निरिक्षक श्री.निलेश लोधी, पंच क्रं.२ व काही सापळा पथकातील कर्मचारी खाजगी वाहनाने व पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर असे एका मोटार सायकलीने रवाना झालो.

तेव्हा तक्रारदार व पंच क्र.१ असे अडावद बस स्टॅण्ड येथे थांबल्याने आम्ही देखील खाजगी वाहन तक्रारदार व पंच क्र.१ हे उभे असलेल्या ठिकाणापासुन काही अंतरावर उभे करण्यास सांगितले. तसेच पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर हे सुध्दा तेथे पोहचले. त्यानंतर श्री.जी.ए.शेख यांनी तक्रारदारासोबत तक्रारदाराच्या मोटारसायकलवर बसून चोपडयाला जाण्याचे सांगितल्याने तक्रारदाराने त्यांच्या वडिलांना मोजणीच्या साहित्यासह एका रिक्षात बसवले व त्याच रिक्षात पंच क्र १ हे देखील बसले व सदर रिक्षा चोपडयाकडे जाण्यास निघाली. सदर रिक्षाच्या पाठोपाठ लागलीच तक्रारदार व श्री.जी.ए.शेख हे तक्रारदार यांच्या दुचाकी मोटार सायकलीने चोपडा गावाकडे जाण्यास निघाले. त्यानंतर त्यांच्या मागोमाग पोकॉ अरुण पाटील व पोकॉ ईश्वर धनगर असे एका दुचाकी मोटार सायकलीने रवाना झाले व त्यांच्या मागे आम्ही, पंच क्र.२ व सापळा पथकातील कर्मचारी असे तवेराने निघाले.

त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व श्री.जी.ए.शेख असे चोपडा शहरातील पंचायत समिती कार्यालयाचे गेटच्या समोर असलेल्या चहाच्या दुकानावर थांबले. त्यांच्या पाठोपाठ पंच क्र १ व तक्रारदाराचे वडिल बसलेली रिक्षा तेथे पोहोचली. थोडया वेळात पो. कॉ. अरुण पाटील व ईश्वर धनगर हे मोटार सायकलने तसेच आम्ही व सापळा पथक तवेराने थोडया अंतरावर येवून थांबलो. तेव्हा आम्ही चहाच्या दुकानाच्या आजुबाजुस सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा सापळा पथकातील सदस्य चहाच्या दुकानाजवळ सुरक्षित जागा घेवुन थांबुन होते. त्यानंतर तक्रारदार यांचे वडीलांनी रिक्षातुन मोजणीचे साहित्य उतरविले व तक्रारदाराचे वडिल आणि पंच क्र. १ असे दोघे जण तक्रारदार व श्री. जी.ए.शेख हे उभ्या असलेल्या चहाच्या दुकानाजवळ गेले. तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा कोणत्याही प्रकारचा ईशारा केला नाही. नंतर तक्रारदार व श्री.जी.ए.शेख असे तक्रारदार यांच्या मोटार सायकलवर चोपडा शहरातील आझाद चौकाकडे जाण्यास निघाले. तक्रारदार हे मोटार सायकल चालवत होते तर जी.ए.शेख हे मोजणीचे साहित्य हातात धरुन तक्रारदार यांचे मोटार सायकलवर मागे बसुन होते. त्यांच्या पाठोपाठ थोडया अंतरावरुन आम्ही पोकॉ अरुण पाटील यांना मोटार सायकलवर पंच क्र.१ यांना सोबत घेवुन तक्रारदार व श्री.जी.ए.शेख यांच्या मोटार सायकलीचे मागोमाग जाण्यास सांगितले. तसेच आम्ही व सापळा पथक पो.कॉ.ईश्वर धनगरसह तवेराने वरील दोन मोटार सायकलींच्या मागोमाग निघाले.

त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व श्री.जी.ए.शेख असे चोपडा शहरातील आझाद चौकाजवळील पाटील दरवाज्यातून जावून एका मशिदीजवळ थांबले. त्यानंतर त्यांच्या मागोमाग पोकॉ अरुण पाटील व पंच क्र.१ सुध्दा काही अंतरावर थांबले. तेव्हा आम्ही आझाद चौकाजवळील मशिदीजवळ काही अंतरावर खाजगी वाहन उभे करण्यास सांगितले. तेव्हा आम्ही आझाद चौकाजवळील मशिदीजवळ सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी आझाद चौकाजवळील मशिदीच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबले. श्री.जी.ए.शेख व तक्रारदार असे मशिदीच्या बाजुच्या जिन्यातून वर गेले. पंच क्र.१ हे जिन्याजवळ उभे होते. नंतर ठीक १८.०५ वा. तक्रारदार यांनी श्री.शेख यांना पैसे दिल्याचा इशारा करताच आम्ही, पो.कॉ. अरुण पाटील, ईश्वर धनगर व त्यांच्या पाठोपाठ सापळा पथकातील कर्मचारी असे जिन्याच्या पायथ्याजवळ पोहचलो असता श्री.शेख यांनी त्यांच्या हातातील नोटा खाली जमिनीवर फेकल्या. तेव्हा पंच क्र. १ यांनी खाली जमिनीवर पडलेल्या २ नोटा उचलल्या असता तक्रारदाराने सांगितले की, त्यांनी श्री.शेख यांना १५०० रु दिले होते. म्हणून पुन्हा बारकाईने शोध घेतला असता तिसरी नोटही पंच क्र.१ यांना सापडली. सदर सापळा पथकातील कर्मचारी आमचेसह लगेचच श्री.शेख उभ्या असलेल्या ठिकाणी जिन्यावरुन गेले व त्यांना पकडले. तसेच तक्रारदार यांच्या कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर आमच्या सुचने वरुन पोकॉ नासिर देशमुख यांनी ताब्यात घेवुन ते बंद केले व पंच क्र. १ यांना आम्ही विचारणा केली असता पकडलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हे श्री.जी.ए.शेख आहेत त्यांनी तक्रारदार यांच्याकडे २०००/– रुपयांची मागणी केली तेव्हा तक्रारदार यांनी उजव्या हाताने त्यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिश्यातुन नोटांची घडी काढुन त्यापैकी १०००/– रुपये श्री.जी.ए.शेख यांना दिले, तेव्हा त्यांनी सदरचे पैसे उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन हे फक्त १०००/–रुपये आहेत, अजुन ५००/– रुपये तरी दया असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी पुन्हा त्यांच्या हातातील नोटांच्या घडीमधील ५००/– रुपयांची एक नोट काढुन श्री.जी.ए.शेख यांना दिली. अशाप्रकारे श्री.जी.ए.शेख यांनी सदरची एकुण १५००/– रुपये उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजली त्याच वेळी श्री.शेख यांनी आम्हाला पाहिले आणि त्यांच्या हातातील नोटा त्यांनी खाली जमिनीवर फेकल्या, सदर तिन्ही नोटा पंच क्र.१ यांना सापडल्या असून त्या त्यांचे हातात असल्याचे पंच क्र.१ यांनी सांगितले.

तेव्हा आम्ही, आमची ओळख सांगुन, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. आम्ही, पोकॉ अरुण पाटील व पोकॉ प्रविण पाटील यांना श्री.जी.ए.शेख यांचे दोन्ही हात मनगटा पासुन धरुन ठेवण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही हात धरलेल्या स्थितीत श्री.जी.ए.शेख यांना त्यांचे नाव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव गनी अहमद शेख, वय.४२, व्यवसाय नोकरी, दुरुस्ती लिपीक, नेमणुक उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, चोपडा रा. आझाद चौक, मशिदी शेजारी, चोपडा ता.चोपडा जि.जळगांव असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना उजव्या हाताने कशालाही स्पर्श न करणेबाबत सुचना दिल्या. पंच क्र.१ यांच्या हातात असलेल्या सदर लाचेची रक्कम मोजुन पाहता १५००/– रु. (५००/– रु दराच्या ०३ नोटा ) मिळुन आल्या.

त्यानंतर आलोसे श्री.गनी शेख यांचे आझाद चौकाजवळील मशिदी शेजारीच भाडयाचे घर असल्याने व ते सदर ठिकाणी एकटेच राहत असल्याने पुढील कार्यवाही आलोसे श्री.गनी शेख यांच्या भाडयाच्या घरात करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही पोकॉ अरुण पाटील व पोकॉ प्रविण पाटील यांना हात धरलेल्या स्थितीत आलोसे श्री.गनी शेख यांना ते राहत असलेल्या भाडयाच्या घरात आणण्यास सांगितले. त्यानंतर आलोसे श्री.गनी शेख यांच्या राहत्या घरातील रुममध्ये पुर्ण अंधार करुन अ.व्हा.दिव्याच्या प्रकाशझोत सदर नोटा सरळ करुन नोटांवर टाकुन परिक्षण केले असता १५००/– रु. (५००/– रु दराच्या ०३ नोटा) नोटांवर मागुन पुढुन अ.पा.ची हिरवट चकाकी स्पष्ट दिसुन आली. त्यानंतर कक्षात उजेड करुन दि. १४.११.२०१८ रोजी करण्यात आलेला सापळा पुर्व पंचनामा पंच नं.२ यांचे

कडेस देवुन त्यांना त्यात नमुद लाचेच्या नोटांचे नंबर्स वाचण्यास सांगुन ते नंबर पंच क्र.१ यांच्या कडेस असलेल्या नोटांशी पडताळणी केली असता सदर तिन्ही नोटांचे नंबर्स पंचनाम्यातील ४ पैकी ३ नंबर्सशी तंतोतंत जुळुन आले. तसेच तक्रारदार यांच्याकडे एक ५००/— रु दराची नोट मिळुन आली सदर नोटेचा नंबर सापळा पुर्व पंचनाम्यात नमुद चौथ्या नोटेशी तंतोतंत जुळुन आला. तसा सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे आलोसे श्री.गनी अहमद शेख, वय.४२, व्यवसाय नोकरी, दुरुस्ती लिपीक, नेमणुक उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, चोपडा रा.आझाद चौक, मशिदी शेजारी, चोपडा ता.चोपडा जि.जळगांव यांनी त्यांना कायदयाने मिळण्याचे वेतन खेरीज करुन प्रर्वतक दान म्हणुन तक्रारदार श्री.योगेश धनराज पाटील यांच्याकडे त्यांचे घराच्या जागेची मोजणी करुन देण्याच्या मोबदल्यात तडजोडीअंती २०००/— रुपयांची मागणी करुन १५००/—रु. लाचेची रक्कम आलोसे श्री.गनी अहमद शेख यांनी स्वत: स्विकारली म्हणुन त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक (सुधारीत) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा केला आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत जाँच फार्म -I)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठा.अंमलदार
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
चोपडा शहर पो.स्टे.

**Name (नाम):** KISAN LAXAMAN NAJAN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN64414